**MHJN060022402022**

## निशाणी क्र. १ खालील अर्ज

अपराध क्रमांक ४९०/२०२२ मध्ये जप्त करण्यात आलेले वाहन अर्जदाराचे सुपुर्त करण्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४५७ अन्वये सदर अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

०२. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे पोलीस ठाणे भोकरदन यांचे मार्फत नोंदविण्यात आलेल्या अपराध क्र. ४९०/२०२२ मध्ये जप्त करण्यात आलेली हयुंदई कंपनीचे सँट्रो वाहन नोंदणी क्र. एम.एच.–०४–बी. एन.–०२५५ ज्याचा Chassis no. MALAA51HR2M287208L and Engine no. G4HD2B65138 चा अर्जदार हा मालक असून सदर वाहन पोलीस ठाण्यामध्ये पडून राहील्यास त्याचे नुकसान होईल. करिता ते अर्जदाराचे सुपुर्त करण्याबाबत त्याने विनंती केली आहे.

०३. सरकारी विधीज्ञ यांनी सदर जप्त मुद्देमाल अर्जदाराच्या सुपूर्त करण्यास त्यांची हरकत असल्याचे सांगितले तर तपासी अधिकारी यांनी सदर जप्त मुद्देमाल अर्जदाराचे सुपूर्त करण्यास हरकत नसल्याचे सांगितले. अर्जदार याने जप्त वाहन विक्रीच्या करारनाम्याची पडताळणीकृत प्रत, स्वतः चे आधार ओळखपत्राची पडताळणीकृत प्रत व गुन्हा क्र. ४९०/२०२२ च्या प्रथम खबर अहवालाची सत्यप्रत व जप्त वाहनाच्या इन्शुरन्सची संगणकीक्त प्रत दाखल केलेली आहे. तसेच अर्जदार याने दाखल केलेल्या जप्त वाहनाच्या आर. सी. च्या पडताळणीकृत प्रतीवरून सदर वाहन अर्जदाराचे मालकीचे असल्याचे स्पष्ट होते. सदर वाहन पोलीस ठाण्याच्या कार्यालयाच्या आवारात ठेवण्यात आलेले आहे. खटल्याचा निकाल लागेपर्यत बराच वेळ लागणार आहे. अशा परिस्थितीत सदर वाहन पोलीस ठाण्याच्या आवारामध्ये विनाकारण पडून राहील्यास त्याचे नुकसान होईल. करिता सदर मुद्देमाल अर्जदाराचे सुपुर्त करणे योग्य होईल. परंतु सदर मुद्देमाल गुन्हयाच्या कामी जप्त करण्यात आलेले असल्याने ते अर्जदाराचे सुपुर्त करते वेळी त्याबाबत योग्य त्या अटी लादणे आवश्यक आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करते.

## आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. अपराध क्र. ४९०/२०२२ पोलीस ठाणे भोकरदन मध्ये जप्त केलेली हयुंदई कंपनीचे सँट्रो वाहन नोंदणी क्र. एम.एच.–०४–बी. एन.–०२५५ ज्याचा Chassis no. MALAA51HR2M287208L and Engine no. G4HD2B65138 चा अर्जदार उमेर ईकबाल कुरेशी याचे रक्कम रूपये ९,००,०००/– च्या बंधपत्रावर (इंडेम्नीटी बॉड) वर सुपुर्त करण्यात यावे.

०३. अर्जदार याने सदर खटल्याचा निकाल लागेपर्यत वरील नमुद वाहनाचा रंग व त्याचे स्वरूपात बदल करू नये किंवा त्याची विक्री व हस्तांतरण करू नये व न्यायालय आदेश देईल त्याप्रमाणे खटल्याच्या कामी हजर करावी.

०४. अर्जदार याने सदर वाहन कोणताही गुन्हा करण्याचे कामी उपयोगात आणू नये.

०५. तपासी अधिकारी यांना असे निर्देश देण्यात येते की, सदर आदेशाची एक प्रत बंधपत्र (इंडेम्नीटी बॉड) दोषारोपपत्रासह न्यायालयात दाखल करावी.

ROHINI VISHNU PATIL
Digitally signed by ROHINI VISHNU PATIL
Date: 2022.10.04 10:55:51 +0530

स्वाक्षरित/–
(आर. व्ही. पाटील)

दिनांकः ०३.१०.२०२२.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
भोकरदन

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे

न्यायालयाने नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन

मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः ०३.१०.२०२२

स्वाक्षरित/–
लघुलेखकाची सही